# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक ११/११/२००२ रोजी संस्थागित बैठक दिनांक १६.११.२००२ रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

**सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. आ. श्री. कुंडलीकराव नागरे. | : | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| २) | मा.श्री. के.बी. गवळी. | : | उप - सभापती तथा<br>मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ. |
| ३) | मा. श्री. मंकरद सावे | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ४) | मा. श्री. बबनराव देशमुख | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ५) | मा. श्री. डी. डी. शिंदे | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ६) | मा. श्री. चाँदपाशा इनामदार | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ७) | मा. श्री. साहेबराव खरात | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ८) | मा. श्री. राजेश्वर चव्हाण | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ९) | मा. श्री. संजय वाघचौरे | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ९) | मा. श्री. वामनराव राऊत | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| १०) | मा. सौ. शैलेजा गायकवाड | : | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| ११) | मा. श्री. सिंकदर अली<br>कार्यकारी अभियंता,<br>मा. आयुक्त,<br>महानगरपालिका, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | : | सदस्य, प्रतिनिधी. |
| १२) | श्री, मो. मुदस्सीर, नगर रचनाकार,<br>मा. उप संचालक,<br>नगर रचना यांचे प्रतिनिधी. | : | **सदस्य - प्रतिनिधी.** |

......

मंडळाच्या १२२ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांचे प्रथम मुख्य अधिकारी/ औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत केले. बैठकीच्या कामकाजास सुरुवात होण्यापूर्वी मा. सदस्य, श्री. इनामदार यांनी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री मा. ना. विलासरावजी देशमुख साहेब यांचे वडील कै. दगडोजीराव देशमुख यांचे दु:ख झाल्यामुळे शोक प्रस्ताव मांडला व मंडळाने शोक प्रस्ताव पारीत करुन श्रध्दांजली वाहीली. नंतर मा. सभापती/ औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास, पटलावरील विषयास सुरुवात झाली.

**विषय क्रमांक : (२) : औरंगाबाद मंडळाचा सन २००० - २००१ या वर्षाचा वार्षिक लेखा संमत करणे बाबत.**

या विषयाच्या बाब टिप्पणीतील विषयाबाबत मंडळाचे मुख्य लेखा अधिकारी श्री. त्रिंबके यांनी बैठकीत माहिती दिली. मुख्य लेखा अधिकारी यांनी सांगितले की, सन २००० - २००१ या वर्षाचा वार्षिक लेखा हा प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक यांचेकडुन तपासून व प्रमाणित करुन घेतला आहे. व प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक यांनी सदर लेखा औरंगाबाद मंडळाची मान्यता घेवून प्राधिकरणाकडे सादर करावा असे कळविलेले आहे, म्हणून सदर विषय मंडळाच्या मंजुरीस्तव सादर केला आहे. मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मागील बैठकीत हा विषय स्थगित ठेवण्यात आला होता. परंतु आता या विषयास मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यावर, मंडळाचा वार्षिक लेखा ( २०००-२००१ ) हा प्राधिकरणास पाठविण्यात येईल. मंडळाचे मा. सभापती व मा. सर्व सदस्य यांनी बैठकीत सन २००० - २००१ या वर्षाच्या वार्षिक लेख्याची नोंद घेतल्याबद्दल त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे असे सांगितले व सुचना केल्या की, मंडळाच्या शिफारशीसह सदर लेखा प्राधिकरणास पाठविण्यात यावा व मंडळाने निर्णय घेता की,

**ठराव क्रमांक : ७२८**

**मंडळाचा सन २००० - २००१ चा वार्षिक लेखा मंजूर करण्यांत येत आहे व सदर लेखा मंडळाच्या शिफारशीसह प्राधिकरणास पाठवावा अशी सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर ठरावाच्या स्थायिकरणाची वाट न पाहता पुढिल कार्यवाही करावी.**

**विषय क्रमांक : (३) गट क्रमांक १०४/१ तिसगांव, औरंगाबाद येथील जमिनीवर राष्ट्रीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत प्रस्तावित अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट गाळयांच्या ऐवजी विकसित भुखंड योजना राबविणे बाबत.**

मंडळाचे मुख्य अधिकारी यांना सदर विषयाच्या बाब टिप्पणी विषयी मंडळास सविस्तर माहिती दिली की, तिसगांव येथे मंडळाने ५१२ गाळे अल्प उत्पन्न गट व ३८ गाळे मध्यम उत्पन्न गटाच्या योजना बांधून पूर्ण केल्या आहेत. परंतु ५१२ गाळे अल्प उत्पन्न गटापैकी ४५३ गाळे व ३८ गाळे मध्यम उत्पन्न गटाचे वाटप सुरु केले असता ४५३ पैकी फक्त २८ लाभार्थींनी व ३८ पैकी फक्त २ लाभार्थींनी गाळे आता पर्यंत ताब्यात घेतलेले आहेत व बाकीच्या अर्जदारांनी अद्याप पैसे भरले नाहीत. परिणामी गाळे वाटपाअभावी रिक्त आहेत. गाळे रिक्त पडण्याबद्दल मुख्य अधिकारी

यांनी मंडळास माहिती दिली की, त्या भागांतील कामगार व मजूरवर्ग इतरत्र स्थलांतरीत झाल्यामुळे तसेच त्या भागांतील पाण्याच्या पुरवठयाच्या प्रश्नामुळे तिसगांव येथील उपरोक्त प्रमाणे गाळे अद्याप रिक्त आहेत. म्हणून यापुढे तिसगांव येथे मंडळाच्या जमिनीवर प्रस्तावित २४ गाळे उच्च उत्पन्न गट व १०६ गाळे मध्यम उत्पन्न गटाच्या योजनेअंतर्गत गाळे बांधकाम न करता त्या ठिकाणी विकसित भुखंडाच्या योजना राबविल्यास त्यास मागणी मिळू शकेल व मंडळाचा अडकलेला निधी मोकळा होऊ शकेल. मा. सभापती यांनी सांगितले की, तिसगांव येथील रिक्त असलेले गाळे वाटपासाठी प्रयत्न करावे व त्यासाठी त्या भागांतील कारखान्यातील कर्मचारी / कामगार, महसूल विभागाचे कर्मचारी तलाठी/ मंडळ कर्मचारी, ग्रामसेवक व ( त्यांची संघटना ) , त्या भागांतील शिक्षक वर्ग व त्यांची संघटना , एस. टी. कर्मचारी, पोलिस विभागाचे पोलीस व त्यांचे कर्मचारी, कामगारांच्या संघटना यांना प्रत्यक्ष संपर्क साधुन व त्यांचेशी बैठका घेवून मंडळाचे गाळे वाटप करण्यासाठी प्रयत्न करावा व पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेण्यासाठी देखील कार्यवाही करावी. मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, तिसगांव येथे सिडकोने पाणी पुरवठयाच्या पाईप लाईन टाकल्या आहेत. तसेच त्यांनी दिनांक ३१/१२/२००२ पर्यंत पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन देखील दिले आहे व त्यासाठी सिडकोकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मंडळाचे सदस्य मा. शिंदे यांनी सांगितले की, तिसगांव तसेच मराठवाडयात इतर ठिकाणी जेथे जेथे गाळयांना मागणी नाही व तेथे जमिन शिल्लक आहे अशा ठिकाणी गाळयांच्या योजना न राबविता विकसित भुखंडाची योजना राबवावी व एका अर्जदारास अल्प उत्पन्न गटाअंतर्गत भुखंड योजनेतुन दोन भुखंड घेण्याची सवलत देण्यात यावी जेणे करुन त्या ठिकाणी लाभार्थी व्यवस्थित घर बांधू शकेल व भुखंडासाठी मागणीही मिळू शकेल. मंडळाचे मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी तिसगांव येथे प्रस्तावित १०६ गाळे मध्यम उत्पन्न गट योजना व २४ गाळे उच्च उत्पन्न गट योजनेऐवजी विकसित भुखंड योजना राबविण्यात यावी म्हणून मंजुरी दिली व भुखंड योजना राबविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी असेही मंडळाने सांगितले. मा. सभापती यांनी सांगितले की, तिसगांव येथील जे गाळे रिक्त आहेत त्या गाळयांना सिडकोकडुन पाणीपुरवठा मिळाल्यानंतर नियमानुसार तीन जाहिराती काढूनही गाळे विक्री झाले नाही तर त्यानंतर नियमाप्रमाणे गाळयांच्या किंमती कमी करुन गाळे विक्री करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की,

**<u>ठराव क्रमांक ७२९</u> :**

**तिसगांव येथे मंडळाच्या २४ गाळे उच्च उत्पन्न गट व १०६ गाळे मध्यम उत्पन्न गट या योजनेखालील जमिनीवर तसेच मंडळाचे अखत्यारितील इतरत्र जेथे जमिन शिल्लक आहे आणि गाळयांना मागणी नाही तेथे गृहनिर्माण योजनेऐवजी विकसीत भुखंडाची योजना राबवावी. त्याचप्रमाणे तिसगांव येथील रिक्त गाळे विक्री करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा.**

**<u>विषय क्रमांक : (४)</u>:**

**<u>जालना येथे गृहनिर्माणासाठी सर्वे नं. ११८ मधुन ७.३३ हेक्टर जमिन म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ५२ अन्वये खरेदी करणे बाबत.</u>**

मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी या विषयाच्या बाब टिप्पणी बाबत मंडळास सविस्तर माहिती दिली की, जालना हे जिल्हयाचे ठिकाण आहे. शैक्षणिक , औद्योगिक व विकसनशील शहर आहे व तेथील वाढत्या लोकसंख्येच्या घराच्या समस्या सोडविण्यासाठी जालना येथे मंडळास भविष्यात गृहनिर्माण योजना राबविणेसाठी जमिनीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यादृष्टीने मंडळाने जालना येथे गृहनिर्माण योजनेसाठी योग्य अशा खाजगी ( ट्रस्टची ) जमिन म्हाड कायदा कलम -५२ अन्वये खरेदी करण्यासाठी प्रस्तावित केली आहे व सदर जमिन सर्वे नंबर ११८ ही गोरक्षण ( ट्रस्ट ) संस्थेच्या मालकीची असून ती मोक्याच्या ठिकाणी आहे व ही जमिन श्रीकृष्णनगर व संभाजीनगर या वसाहतीला लागून आहे व या जमिनीमधील ७.३३ हेक्टर क्षेत्र उपरोक्त ट्रस्ट मंडळास देण्यास तयार झाल्यानुसार सदर जमिन खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर जमिन म्हाडाचे तत्कालीन मा. उपाध्यक्ष यांनीही प्रत्यक्ष मोक्यावर पाहणी केली व त्यांनीही सदर जमिन खरेदी करणेसाठी सुचना केली व त्यानुसार जमिन खरेदीचा विहित नमुन्यातील प्रस्ताव मंडळाने मंजुरी दिल्यास सदर जमिन कलम - ५२ खाली खरेदी करणेसाठीची बाब मुल्यांकन कमिटीपुढे ठेवण्यात येईल. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल. मा. सभापती व मंडळाचे सदस्य यांनी सदर जमिन कलम -५२ खाली खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली. मंडळाचे मा. सभापती यांनी व मंडळाचे मा. सदस्य यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मुल्यांकन समितीमध्ये त्या - त्या जिल्हयांचे स्थानिक सदस्य यांना बैठकीच्या वेळी निमंत्रित करावे व त्यांच्या उपस्थितीत उक्त जमिन कलम - ५२ खाली घेण्यासाठी कार्यवाही करावी. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदरील जमिनी बाबतीत मुल्यांकन समितीच्या बैठकीच्या वेळी जालना येथील स्थानिक मंडळाच्या सदस्यांना बोलाविण्यात येईल.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७३० :**

**जालना येथील गोरक्षण ( ट्रस्ट ) संस्थेच्या सर्वे नंबर ११८ मधील ७.३३ हे. जमिन म्हाड कायदा कलम -५२ खाली खरेदी करण्यास मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली त्याप्रमाणे प्राधिकरणास प्रस्ताव पाठवून व मंजुरी मिळवून सदर बाब मुल्यांकन समितीपुढे ठेवण्यांत यावी असाही निर्णय सर्वानुमते घेतला. तसेच मुल्यांकन समितीच्या बैठकीच्या वेळी जालना येथील स्थानिक सदस्यांना बोलाविण्यात यावे असाही मंडळाने निर्णय घेतला.त्याचप्रमाणे इतर बैठकीचे वेळी स्थानिक सदस्यांना निमंत्रीत करण्यांत यावे व स्थायीकरण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.**

**विषय क्रमांक : ५** **गृहनिर्माण भवनाजवळील नगर भुमापन क्र. २०७१९ या जमिनीवरील व्यापारी संकुलासाठी प्राप्त मागणी प्रतिसाद व त्या अनुषंगाने त्या ठिकाणी भविष्यात हाती घ्यावयाच्या योजनेबाबत.**

या विषयीच्या बाब टिप्पणी बाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली की, गृहनिर्माण भवना जवळील भुमापन क्रमांक २०७१९ मधील शिल्लक असलेल्या जमिनीवर व्यापारी संकुलाची ६४ कार्यालयीन सदनिकांची योजना जाहीर केली होती. परंतु त्यास काहीच मागणी प्राप्त झाली नाही. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाच्या मागील बैठकीत वेळोवेळी झालेल्या निर्णयाप्रमाणे सद्यः स्थितीत असलेल्या दोन जुन्या इमारती पाडुन त्याखाली असलेल्या मोक्याच्या जागेचा समावेश व्यपारी संकुलात करुन सध्या इमारतीत असलेल्या दुकानदारांना विनामुल्य दुकाने देवून आकर्षक योजना राबवावी व त्या दृष्टीने दुकानदारांशी चर्चा करुन त्यांची सहमती मिळण्यासाठी कार्यवाही करावी. त्याप्रमाणे संबंधित दुकानदारांची बैठक घेवून योजनेची प्राथमिक माहिती दिल्याचे व त्यास दुकानदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले. परंतु त्याचवेळी ही योजना राबवण्यास येणाऱ्या अडचणी जसे संकुलाचे काम चालु असतांना संबंधित दुकानदारांची पर्यायी व्यवस्था करणे, सर्व दुकानदारांना त्यास मान्यता देणे, सध्याचे दोन इमारतींमधील जागेचा वाद मिटविणे इत्यादी अडचणी असल्याने सदर योजना राबविण्यास विलंब

होवू शकेल असे प्रतिपादन करुन त्या ठिकाणी उच्च उत्पन्न गटासाठी फ्लॅटची योजना राबवणे जास्त उचित होईल असे मुख्याधिकारी यांनी मत मांडले. तथापि, मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. श्री. डी. डी. शिंदे यांनी सदरील जागेवर एक अद्यावत असे व्यापारी संकुल बांधणेच जास्त फायदेशीर ठरेल असे सांगितले. तसेच सदरील संकुल उभारण्यासाठी ज्या संभाव्य अडचणी मुख्य अधिकारी यांनी मांडल्या आहेत त्या दूर करता येणे शक्य असून त्यादृष्टीने कार्यवाही करणेबद्दल सुचना मांडल्या. या बाबत मा. सदस्य श्री. शिंदे यांनी सांगितले की, सध्या स्थित असलेल्या इमारती ताबडतोब न पाडता त्यांच्या पाठीमागून प्रथम संकुलाचे बांधकाम सुरु केल्यास दुकानदाराला लगेच पर्यायी दुकाने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता भासणार नाही. दोन इमारतीमधील असलेल्या गॅरेजचे वादग्रस्त कोर्टातील प्रकरण गॅरेजवाल्यास मागे घेण्यास सांगणे सध्या इमारतीमध्ये सरकारी कार्यालयांना भाडयाने दिलेल्या जागेचा करार रद्द करणे व या संकुलाचे प्रस्तावित डिझाईन दुकानदारांना दाखवून व संभाव्य अडचणींची त्यांना कल्पना देवून इत्यादी बाबींची पुर्तता करुन व त्यांच्या सोबत एक बैठक घेवून सदर अडचणीतुन मार्ग काढता येईल असे त्यांनी सांगितले. त्यामुळे सदर दुकानदारांना दिनांक २१/११/२००२ रोजी कार्यालयात बोलावून घेण्यात यावे व त्यांच्याशी बैठक घेवून यातुन मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात यावा. या बाबत मा. सभापती यांनी सांगितले की, २१/११/२००२ रोजी दुकानदारांसमवेत मंडळाचे मा. सदस्य श्री. शिंदे व श्री. वाघचौरे यांचे उपस्थितीत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी बैठक घेण्याची कार्यवाही करावी. मा. श्री. सावे सदस्य यांनी सांगितले की, या सर्व संकुलाच्या योजनेत जुन्या इमारती पाडुन त्यातील दुकानदारांना विनामुल्य दुकाने देतांना मंडळाचे हीत जोपासण्याचा दृष्टीकोन ठेवून त्याप्रमाणे डिझाईन तयार ठेवावे. मा. सभापती यांनी अशाही सुचना दिल्या की, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर या विषयीची तपशिलवार माहिती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे बैठकीमध्ये सांगोपांग चर्चा झाल्यानंतर चर्चेअंती मंडळाने खालील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेतला की,

**<u>ठराव क्रमांक ७३१</u> :**

**गृह निर्माण भवना जवळील भुमापन क्र. २०७१९ जमिनीमधील मंडळाच्या शिल्लक जमिनीवर व्यापारी संकुलाचे ( सध्या अस्तित्वात असलेल्या दोन इमारती खालील जागेचा त्यामध्ये समावेश धरुन ) एक प्राथमिक स्वरुपाचा नकाशा तयार करावा. उपरोक्त प्रमाणे चर्चेनुसार दुकानदारासमवेत दि.२१/११/२००२ रोजी बैठक घेवून दुकानदारांशी चर्चा करुन त्यांची लेखी संमती घेण्याचा प्रयत्न करावा व याविषयी केलेल्या कार्यवाहीचा तपशिल ( संकुलाच्या डिझाईनसह) मंडळाच्या अगामी बैठकीत विचारार्थ ठेवण्यांत यावा.**

**<u>विषय क्रमांक :</u> ६ : <u>कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे काही कामे ठेका पध्दतीने करुन घेण्यास मान्यता मिळणेबाबत.</u>**

या विषयातील बाब टिपणी विषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली त्यानुसार मुख्य लेखा अधिकारी यांनी अशीही माहिती सांगितली की, सध्या मंडळात चतुर्थश्रेणी / सफाई कामगार हे अत्यंत अपुरे आहेत. परिणामी कार्यालयातील सफाईची कामे, विश्रामगुहातील साफसफाईची कामे, मंडळाच्या विविध वसाहती मधील व मंडळाच्या प्रशासकीय इमारतीमधील पंप चालवून पाणीपुरवठयाची कामे , कार्यालयातील बागेची निगा राखणी, पाहुण्यांची व्यवस्था करणे, इत्यादी कामे करण्यास मंडळाकडे कर्मचारी नाहीत. सदर कामे करुन घेणे देखील अगत्याचे आहे. सध्या शासनाने / प्राधिकरणाने रोजंदारी पध्दतीवर कामे करुन घेण्यास कर्मचारी लावण्यास संपूर्णतः बंदी घातली आहे. परिणामी उपरोक्त प्रमाणे कामे करुन घेण्यास मंडळास अडचणी येत आहेत. म्हणून वरील प्रमाणे कामे ही ठेका पध्दतीने एक वर्षाच्या करारावर दरपत्रके मागवून केल्यास त्या बाबत म्हाडाला कर्मचाऱ्यांचे / कामगारांचे दायीत्व राहणार नाही. ठेका पध्दतीने कामे करुन घेतल्यास इतर संकीर्ण खर्चामधुन खर्च भागविता येईल व उपरोक्त सर्व कामांसाठी अंदाजे रुपये ५०००/- ते ६०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. अशीही माहिती मुख्य लेखा अधिकारी यांनी मंडळास दिली. म्हणून सदर बाब मंडळाच्या विचारार्थ सादर केलेली आहे. या बाबत मंडळाचे मा. सभापती व सर्व सदस्य यांनी सर्वानुमते ( उपरोक्त कामाची निकड लक्षात घेता ) ठेका पध्दतीवर वरील कामे करुन घेण्यास मंजुरी दिली व सदर बाबी म्हाडाच्या प्रचलित नियमांच्या अधिन राहून करण्यात याव्यात. अशी मंडळाने सुचना केली व निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७३२ :

मंडळान्तर्गत मंडळाच्या विश्रामगृहाची साफसफाई करणे, येणाऱ्या अतिथींची व्यवस्था करणे, मंडळाच्या इमारतीतील (परिसरातील) मोकळया जागेची निगा राखणे/ बागेची निगा राखणे, मंडळाच्या कार्यालयातील व विश्रामगृहातील पंप हाऊस चालवून पाणीपुरावठा व देखरेख करण्यासाठी व मंडळाच्या विविध वसाहतीतील पंप हाऊस चालवून पाणीपुरवठाची इत्यादी कामे ठेका पध्दतीवर रितसर दरपत्रके मागवून व म्हाडाच्या प्रचलित नियमांच्या अधिन राहुन कार्यवाही करावी.

विषय क्रमांक : ७

भोकरदन जि. जालना येथील सर्वे क्रं. ५४ (भाग) या जमिनीवरील अल्प उत्पन्न गटातील १४९ गाळे व अत्यल्प उत्पन्न गटातील १२० गाळयांची गृहनिर्माण योजना निविदा स्विकृती बाबत.

मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, भोकरदन येथील १४९ गाळे अल्प उत्पन्न गट व १२० गाळे अत्यल्प उत्पन्न गटाच्या बांधकामासाठीच्या निविदा मागवून त्या उपमुख्य अभियंता यांचे मार्फत मुख्य अभियंता यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्या असता त्यांनी सदर निविदा जास्त दराच्या असल्यामुळे त्या रद्द करुन फेर निविदा काढण्यांत याव्यात असे त्यांचे दिनांक १९/९/२००२ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविलेआहे. तदनंतर परत मा. उपाध्याक्ष/ प्राधिकरण यांनी या कार्यालयास त्यांचे दिनांक १/१०/२००२ च्या पत्रान्वये असे आदेशित केले की, वरील कामाच्या निविदांबाबत निविदाधारकांसमवेत वाटाघाटी न करता जर जास्तीच्या देकाराबाबत पुरेसे स्पष्टीकरण असल्यास ते रेकॉर्डवर ठेवून मंडळाने त्यानुसार निम्नतम दर स्विकारावा व दर योग्य नसल्यास निविदा पुन्हा मागवाव्यात व त्याप्रमाणे प्रस्ताव मंडळासमोर निर्णयास्तव ठेवण्यांत यावा म्हणून सदर बाब मंडळासमोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर केली आहे. मा. मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले आहे की, वरील परिस्थितीत व सद्यस्थितीत बाजारामध्ये

बांधकामाच्या निविदांच्या दराचा कल पाहता सध्या निविदा कामाच्या किंमतीपेक्षा कमी दराने भरण्याचा कल आहे. म्हणून सदर दोन्ही निविदा रद्द करुन फेर निविदा काढाव्यात या विषयी मंडळाचे सदस्य मा. देशमुख यांनी सांगितले की, लातूर येथे एका योजनेचे काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करण्यात आले त्या धर्तीवरच भोकरदन येथील वरील दोन्ही कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्यात यावे. मा. सदस्य श्री. देशमुख यांनी असेही सांगितले की, उपरोक्त भोकरदन येथील दोन्ही कामांच्या ठेकेदारांबरोबर दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करण्यात याव्यात व ते कामाच्या अंदाजपत्रकीय दरावर काम करण्यास तयार असल्यास त्याप्रमाणे मंडळाने कार्यवाही करावी. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, भोकरदन येथील कामासाठी निविदा मागवूनच एजन्सी निश्चित करावी,असे प्राधिकरणाचे आदेश आहेत. तसेच ठेकेदारासमवेत वाटाघाटी न करता निविदा योग्य दरात असल्यास त्या स्विकाराव्यात नसता त्या रद्द कराव्यात, असा प्राधिकरणाने निर्णय घेतला असून त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले. यावर मा. सभापती यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाचा दिनांक १५/२/२००२ चाठराव क्र. ५७६२ मधील निर्बंधामुळे निविदा दराबाबत वाटाघाटी करता येत नाहीत, त्यासाठी सदर ठरावास स्थगिती देणे बाबत शासनाकडे सादर केलेल्या दिनांक ९/१०/२००२ चे प्रस्तावाचे बाबतीत शासनाने दि. ३१/१०/२००२ चे पत्रान्वये उक्त प्रस्ताव विचाराधीन असल्याचे कळविले आहे. त्यामुळे या बाबत फेरनिविदा काढण्याचा तुर्त निर्णय घेणे उचित होणार नाही. तेव्हा या बाबत पुन्हा शासनाकडे वाटाघाटीचे प्रस्तावावर निर्णय घेणेसाठी पाठपुरावा करावा असे मत व्यक्त केले आणि जर वाटाघाटीस मंजूरी मिळत नसेल तर फेरनिविदामधील विलंब टाळण्याचे दृष्टीने तसेच प्राप्त दर हे अधिक असल्याने सदर कामही सुशिक्षित बेरोजगार अभियंता मार्फत करुन घेण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी पुन्हा प्राधिकरणाकडे पाठवावा असे सुचविले. यास मंडळाच्या सर्व मा. सदस्यांनी मान्यता दिली व बैठकीत मंडळाने खालील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७३३ :**

**भोकरदन येथील १२० गाळे अत्यल्प उत्पन्न गट योजना १४९ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळयांचे निविदेच्या बाबतीत वाटाघाटी संदर्भात दाखल केलेल्या व शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या दिनांक ९/१०/२००२ च्या प्रस्तावाचे अनुषंगाने पाठपुरावा करावा. तसेच जर उक्त प्रस्तावास मान्यता मिळाली नाही तर सदर काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे मार्फत करुन घेणेसाठी प्राधिकरणाकडे पुन्हा प्रस्ताव पाठविण्यांत यावा.**

**विषय क्रमांक ८ :**

**सर्व्हे क्रमांक ५२७ (भाग) गंगाखेड रोड, परभणी येथील (अल्प उत्पन्न गट) योजनेतील २५ गाळयांपैकी रिक्त असलेले २३ गाळे व (मध्यम उत्पन्न गट) योजनेतील १५ गाळयांपैकी रिक्त असलेले १३ गाळयांचे वाटप भाडे खरेदी तत्वाने विक्री करण्याबाबत.**

सदर विषयाच्या बाब टिप्पणीतील विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली की, परभणी येथील मंडळाने कार्यान्वीत केलेल्या अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत 23 गाळे रिक्त पडलेले आहेत व मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत १३ गाळे रिक्त पडलेले आहेत. सदर गाळे वाटप करण्यासाठी बऱ्याच वर्षांपासून प्रयत्न करण्यांत आले, परंतु त्यास मुळीच प्रतिसाद मिळाला नाही. सदर गाळे विक्रीसाठी मंडळाच्या अटी शिथील केल्या होत्या जसे की, सुरुवातीला गाळा ताब्यात घेण्यासाठी भराव्या लागणाऱ्या रक्कमेचे सुलभ हप्ते पाडुन भरुन घेण्यासाठी सवलत दिली होती. प्रथम येईल त्यास प्रथम गाळा या तत्वावर गाळे देणे, गाळयांच्या किंमती २० टक्के कमी करुन एक रक्कमी किंमतीत विक्री करणे इत्यादी बाबींचा अवलंब करुनही गाळे विक्री झालेले नाहीत. म्हणून सदर गाळे कमी केलेल्या एक रक्कमी किंमतीमध्ये विकण्या ऐवजी आता १५ वर्षांच्या भाडे खरेदी तत्वावर विक्रीसाठी मंजुरीस्तव बाब मंडळासमोर विचारार्थ सादर केली आहे . या बाबत मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांना परभणी येथील अल्प उत्पन्न गटातील **23** रिक्त गाळे व मध्यम उत्पन्न गटातील १३ रिक्त गाळे भाडेखरेदी तत्वावर विक्री करण्यास सर्वानुमते मंजुरी दिली. तसेच मा. शिंदे सदस्य यांनी सांगितले की, मंडळाअंतर्गत इतर ठिकाणी सुध्दा अद्यापही विक्री अभावी रिक्त असलेले गाळे विक्री करण्याचा प्रयत्न करावा व त्यासाठी देखील भाडे खरेदी तत्वावर विक्री करण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. यावर मा. सभापती व मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सांगितले की, मंडळांतर्गत रिक्त असलेले गाळे विक्री करण्यासाठीचे प्रस्ताव मंडळासमोर ठेवण्यात यावे, म्हणजे त्यासही मान्यता देवून गाळे विक्री करण्यांत येतील. वरील प्रमाणे चर्चेअंती मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की,

**<u>ठराव क्रमांक ७३४ :</u>**

**परभणी येथे अल्प उत्पन्न गटातील रिक्त २३ गाळे व मध्यम उत्पन्न गटातील १३ रिक्त असलेले गाळे भाडेखरेदी तत्वावर विक्री करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी दिली. मंडळाअंतर्गत इतर ठिकाणी रिक्त असलेले गाळे विक्रीचे प्रस्ताव मंडळासमोर विचारार्थ ठेवण्यासही मंडळाने सुचना केली.**

**<u>विषय क्रमांक : ९</u>**

**<u>सर्व्हे क्रमांक ११७ (भाग) भोकरदन रोड, जालना येथील १४ गाळे उच्च उत्पन्न गट, भूखंड योजनेतील भुखंड बदलुन मिळणे बाबत श्री. योगेश रामराव अंभोरे यांचा विनंती अर्ज.</u>**

सदर बाब टिप्पणीतील विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जालना येथील सर्वे नं. ११७ वरील १४ उच्च उत्पन्न गट भूखंड योजनेतील एक भुखंड ८ हा श्री. अंभोरे यांना वाटप करण्यात आला होता. तथापी , सदर भुखंडाच्या शेजारी असणाऱ्या अतिक्रमण धारकांकडून श्री. अंभोरे यांना सदर भुखंडावर बांधकाम करण्यास अडथळा निर्माण करीत असल्याची तक्रार श्री. अंभोरे यांनी करुन सदरचा भुखंड बदलुन देण्याची विनंती केली आहे. या प्रकरणी तोडगा काढण्याच्या दृष्टीने या जमिनीच्या आराखडयात सुधारणा करण्यात आली. भुखंड बदलून देण्याची तरतुद विनियमात नाही. तथापि, प्राप्त परिस्थितीत विशेष बाब म्हणून भुखंड बदलून देण्याचा प्रस्ताव मंडळाच्या निर्णयास्तव सादर करण्यात आला आहे. या शिवाय मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशीही माहिती दिली की, या योजनेसाठी २० टक्के आरक्षण प्रवर्गातील अर्ज उपलब्ध नाहीत. २० टक्के आरक्षणाखालील दोन भुखंडाचे वाटप करावयाचे आहे. सध्या सदर प्रवर्गाखाली अर्जच उपलब्ध नसल्याने २० टक्के आरक्षणाखालील प्रवर्गांसाठी येणारा भुखंड क्रमांक ५ हा श्री. अंभोरे यांना बदलुन देण्याचा प्रस्ताव आहे. सदर बदलुन द्यावयाचा भुखंड क्रमांक ५ चे क्षेत्र सुधारीत आराखडयानुसार वाढीव / जास्त आहे व वाढीव क्षेत्राची किंमत श्री. अंभोरे कडुन व्याजासह वसुल करावी लागेल. यात २० टक्के आरक्षणाखाली जो दुसरा म्हणजे १० वा भुखंड येतो त्या ठिकाणी पूर्वीच्या आराखडयाप्रमाणे येणारा भुखंड वाटप झाल्याने, सद्यस्थितीत २० टक्के आरक्षण करता येऊ शकते. यावर मंडळाने निर्णय घ्यावा अशी विनंती मुख्य अधिकारी यांनी केली.

या बाबत सविस्तर चर्चा करतांना बाब टिप्पणीमधील मुद्यांशी मंडळाचे मा. सभापती , मा. सदस्य श्री. वामराव

करण्यांत यावी.मा. सभापती यांनी सुचविलेल्या सदर विषयांतील उपक्रम स्तुत्य असल्याबाबत सर्व मा. सदस्य यांनी मत व्यक्त केले.

मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदरील बाब ही खर्चाची असल्याने त्यास प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.मा. सभापती व मा. डॉ. शिंदे यांनी सांगितले की, सदर सर्वेक्षणाचे काम हे स्वयंसेवी संस्थेमार्फत करुन घेण्याचे प्रस्तावित असल्यामुळे त्यात खर्चाची बाब उदभणार नाही म्हणून वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७३६ :**

**मराठवाडयातील ग्रामीण भागांतील तालुका स्तरावरील बेघरांचे सर्वेक्षण स्वयंसेवी संस्था मार्फत किंवा एन. एस. एस. योजनेच्या माध्यमाव्दारे करुन घेण्यांत यावे व यासाठी करावयाच्या कार्यवाहीसाठी प्राधिकरणाला कळविण्यासाठी मंडळाच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करावा.**

**विषय क्रमांक : ११ मौजे कन्नड जि. औरंगाबाद येथे स.न. ३० व ३१ मधून गृहनिर्माण योजनेसाठी १२.५० एकर जमिन शासनाने म्हाडाच्या ताब्यात दिल्या बाबत महसूलमंत्री महोदयांचे अभिनंदन करणे.**

मा. सभापती यांनी बैठकीत सांगितले की, मौजे कन्नड येथे सर्वे नं. ३० व ३१ मधून १२.५० एकर जमिन गृहनिर्माण योजनेसाठी महसूल विभागाने मंडळाच्या ताब्यात दिली आहे व सदर जमिन गृह निर्माण योजनेसाठी योग्य असून शहरालगत आहे व अशी शासकीय जमिन म्हाडाच्या ताब्यात दिल्याबद्दल मा. ना. श्री.अशोकरावजी चव्हाण , महसुल मंत्री , महाराष्ट्र राज्य यांचे आभार माणण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडला. सदर प्रस्तावास सदस्य मा. डॉ. शिंदे यांनी अनुमोदन दिले व मंडळाने देखील सर्वानुमते मा. महसुल मंत्री महोदयांचे आभार मानण्यासाठी मंडळाचे वतीने मा. सभापती यांनी पत्र लिहावे असा निर्णय घेतला व मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

राऊत व डॉ. शिंदे यांनी सहमती दर्शविली व मंडळाने निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७३५ :**

**बाब टिप्पणीत नमुद केलेल्या मुद्यांचा सांगोपांग विचार करुन जालना येथील सर्वे नंबर ११७ वरील जमिनीमधील १४ विकसीत भूखंड उच्च उत्पन्न गट योजनेतील भुखंड क्रमांक २८० ऐवजी सुधारीत आराखडयानुसार भूखंड क्र. ५ हा श्री. अंभोरे योगेश रामराव यांना बदलून देण्यात यावा व तसेच सुधारीत आराखडयानुसार भूखंडाचे क्षेत्र जास्त/ वाढीव येत असेल तर, वाढीव क्षेत्राची नियमानुसार किंमती व्याजासह वसूल करुन एक विशेष बाब म्हणून भूखंड बदलुन देण्यांत यावा.**

## मा. सभापती - औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय :

विषय क्र. १० : मराठवाडयातील नगर परिषद / ग्रामीण भागांतील बेघरांचे सर्वेक्षणाचे काम अंशकालीन कर्मचाऱ्यांर्फे करुन घेणे बाबत.

या विषयाच्या बाब टिप्पणी बाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली या बाबत मा. सभापती यांनी सांगितले की, मंडळाअंतर्गत नगर परिषद / ग्रामीण भागांत मंडळाच्या कार्यक्षेत्रांत बेघरांचे सर्वेक्षण करुन त्यानुसार भूसंपादनाचे काम व योजनांचे नियोजनाचे काम करता यावे या करिता सुशिक्षित बेरोजगारांमार्फत अंशकालीन पध्दती तत्वावर ही कामे करुन घेण्याचा मनोदय मा. सभापती यांनी व्यक्त केला. या बाबत मा. सभापती यांनी सांगितले की, सदर विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी देखील लातूर येथील कार्यक्रमाच्या वेळी बेघरांचे सर्वेक्षणाचे काम औरंगाबाद मंडळाने करावे म्हणून सम्मती दिली आहे. तसेच या सर्वेक्षणाचे काम लातूर जिल्हयापासून प्रथम सुरु करावे. मंडळाचे सदस्य मा.डॉ. शिंदे यांनी सांगितले की, नगर परिषद हद्दीत / ग्रामीण भागांत नेमके किती बेघर आहेत याची माहिती सर्वेक्षण करुन मिळविल्यास मंडळाला देखील गृहनिर्माण योजनेचे नियोजन करणे सुलभ होईल. या कामी राष्ट्रीय सेवा योजना ( एन. एस. एस. ) व स्वयंसेवी संस्थांची मदत घेवून माहिती गोळा करणे शक्य आहे काय याची तपासणी

**ठराव क्रमांक ७३७ :**

**मौजे कन्नड (जि. औरंगाबाद) येथील स.न. ३० व ३१ मधून १२.५०एकर शासकीय जमिन महसूल विभागाने म्हाडास गृहनिर्माण योजनेसाठी दिल्याबद्दल मा. महसूलमंत्री मा.ना.श्री. अशोकरावजी चव्हाण साहेब यांचे आभार मानण्यासाठीचे पत्र मंडळाच्या वतीने मा. सभापती यांनी मंत्री महोदयांना पाठवावे.**

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मा. सभापती व मा. सदस्य यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले व त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

१) मा. सदस्य श्री. इनामदार व मा. श्री. राजेश्वर चव्हाण यांनी सांगितले की, मंडळाअंतर्गत रुपये ५०.०० लक्षच्या खालील प्रस्तावित कामाची व अन्य कामांची माहिती सदस्यांना दिली जात नाही. या बाबत मा. सभापती यांनी सांगितले की. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी मंडळाच्या सदस्यांना मंडळाच्या कामकाजाची माहिती द्यावी. मुख्य अधिकारी यांनी सांगितले मंडळाच्या मा. सदस्यांना मंडळाच्या कामांची माहिती देण्यांत येईल व त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता व जिल्हा गृहनिर्माण अधिकारी / उप अभियंता यांना सूचनाही देण्यात येतील.

२) मा. सदस्य श्री. इनामदार यांनी सांगितले की, लातूर येथील अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत योजनेतील रिक्त गाळयांसाठी पाच वेळा जाहिरात देवूनही गाळयांना मागणी प्राप्त झाली नाही. म्हणून गाळे लवकर वाटप व्हावे व त्यास मागणी मिळावी म्हणून गाळयांची किंमत कमी करुन विकण्याचा प्रयत्न करावा. या बाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर बाब नियमानुसार तपासून कारवाई करण्यात येईल.

३) मंडळाचे मा. सदस्य डॉ. श्री. शिंदे, श्री. सावे व श्री. इनामदार यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंडळाच्या कार्यक्षेत्रांत विविध वसाहतीत जे काही नियमानुसार सुविधा भूखंड आहेत ते संबंधित विभागाला त्या - त्या भूखंडाच्या आरक्षणाच्या कामासाठी हस्तांतरीत करावे या बाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, महानगरपालिका / नगर पालिका / पोस्ट ऑफिस इत्यादी विभागांना भूखंड हस्तांतरीत करुन घेणेसाठी नियमानुसार पत्र व्यवहार केला आहे. परंतु अद्यापही त्यांचेकडून प्रतिसाद मिळत नाही. सदस्य मा. डॉ. शिंदे व मा. श्री. सावे यांनी सांगितले की, अशा विभागास अंतिम पत्र मंडळाने पाठवावे व एवढे करुनही त्यांनी भूखंड हस्तांतरीत करुन घेतले नाही तर असे सुविधा भूखंड जाहिराती देवून निविदाव्दारे विकण्यासाठी कार्यवाही करावी. तसेच

बगीच्यासाठी आरक्षित भुखंड / शाळेसाठी आरक्षित भुखंड वरील विकास करण्याची कामे ही स्वयंसेवी संस्थांना देता येतील काय या बाबतही विचार करावा असेही मत मा. सदस्य श्री. डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. वरील बाबतीत नियमानुसार काय कार्यवाही करता येईल याची माहिती घेवून पुढील बैठकीत मंडळासमोर माहिती सादर करण्यांत येईल व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत येईल अशी माहिती मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली.

४) मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी सांगितले की, औरंगाबाद मंडळाचे प्रलंबित प्रश्न जसे की, जुळे शहर वसविण्याचा प्रस्ताव, मंडळाच्या योजनांसाठी कर्ज घेणेसाठी शासनाने हमी घेणे, ग्रामीण भागांतील जनतेचे जिवनमान उंचाविण्यासाठी त्यांचेसाठी ग्रामीण घरकुल योजना राबविणे, ग्रामीण भागांतील कुडाची घरे ग्रामीण नियोजन योजनेअंतर्गत बांधुन देणे, म्हाडा कायदा कलम - 52 खालील खाजगी जमिन खरेदी करण्याचे अधिकार मंडळाला देणे इत्यादी प्रश्न / विषयांवर चर्चा करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेत एक बैठक मंडळाचे मा. सभापती व सर्व सदस्य यांचे समवेत घेणे आवश्यक आहे. म्हणजे मंडळाचे प्रश्न मार्गी लागतील या बाबत मंडळाने निर्णय घेतला की, मंडळाचे वतीने मा. सभापती यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेत मंडळाचे उपरोक्त प्रश्न मार्गी लावण्यासाठी बैठकीची तारीख व वेळ घेण्यासाठी मंडळाच्या वतीने मा. सभापती / औरंगाबाद मंडळ यांचे सहीने पत्र लिहुन विनंती करावी असे ठरले.

५) मा. सदस्य डॉ. श्री. शिंदे यांनी प्रतिपादन केले की, औरंगाबाद शहरालगत जुळे शहर वसविण्यासाठी व त्यासाठी जमिन संपादनाची कार्यवाहीसाठी बराच विलंब होत आहे . नुकतेच शासनाने धोरण जाहिर केले की, खाजगी व्यक्तीला / विकासाला जुळे शहर वसविण्यासाठी परवानगी देण्यासाठीचे धोरण शासनाकडून ठरविण्यात येत आहे. त्याचा प्रतिकुल परिणाम म्हाडाच्या कामकाजावर पडू शकतो व म्हाडाकडे काम न राहण्याची परिस्थिती उदभवू शकते. केंद्र शासनाने राष्ट्रीय गृह निर्माण काही वर्षांपूर्वी जाहीर केले आहे व त्यानुसार म्हाडा मार्फत घरकुले बांधण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने जाहिर केले आहे. म्हणून आता जर खाजगी व्यक्तीला / विकासकाला जुळे शहर वसविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने परवागनी दिली तर म्हाडाच्या दृष्टीने अहितकारक ठरेल. म्हणून महाराष्ट्र शासनाने खाजगी व्यक्तीला / विकासकाला जुळे शहर वसविण्यासाठी परवानगी देण्याच्या प्रस्तावित धोरणाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे निदर्शनास उक्त बाब व मंडळाचे इतर महत्वाच्या अडचणी व

प्रश्न नजरेस आणून देणे आवश्यक आहे म्हणून या प्रकरणी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे समवेत एक बैठक औरंगाबाद मंडळाचे मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांचे सोबत घेणे आवश्यक आहे. अशा बैठकीस सचिव ( महसूल ), प्रधान सचिव ( नगर विकास ), प्रधान सचिव ( गृह निर्माण ), विभागीय आयुक्त, औरंगाबाद , सर्व जिल्हाधिकारी , विद्युत मंडळाचे अधिकारी, सिडकोचे अधिकारी, महानगरपालिका आयुक्त व एम. आय. डी.सी. चे अधिकारी यांचे उपस्थितीत एक बैठक लवकरात लवकर घेणे अत्यंत आवश्यक आहे. या बाबत मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनीही वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक घेणे बाबत सहमती दर्शविली व मा. सभापती यांचे सहीने पत्र देवून मा. मुख्यमंत्री यांचे समवेत घ्यावयाच्या बैठकीची तारीख व वेळ घ्यावी असे ठरले.

६) मा. सदस्य श्री. शिंदे यांनी बैठकीत सांगितले की, औरंगाबाद महानगर पालिका हद्दीत राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजनेअंतर्गत जास्त कामे राबविली गेली नाहीत व ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत देखील औरंगाबाद जिल्हयात योजना प्रस्तावित नाहीत. उपरोक्त दोन्हीही योजना प्रभावीपणे राबविणेसाठी आयुक्त महानगर पालिका, औरंगाबाद यांचे समवेत बैठक घेणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, डी. आर. डी. अे. चे अधिकारी व मंडळाचे स्थानिक ( औरंगाबाद जिल्हयाचे ) सदस्य यांचे समवेत एक बैठक घेणे आवश्यक आहे , असेही मा. डॉ. शिंदे यांनी सांगितले जेणे करुन योजनेच्या कामास गती येईल. मा. सभापती यांनी सांगितले की, उपरोक्त चर्चेप्रमाणे राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कामांबाबत महानगर पालिका आयुक्त यांचे समवेत व ग्रामीण निवारा योजनेबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व डि.आर. डी.ए. चे अधिकारी समवेत बैठक ठेवण्याची कार्यवाही मुख्य अधिकारी यांनी करावी. सदर बैठकीस मंडळाचे सदस्य मा. श्री. शिंदे व श्री. वाघचौरे यांना निमंत्रित करावे. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की. उपरोक्त प्रमाणे बैठक घेणेसाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्यांत येईल.

७) मा. सदस्य डॉ. श्री. शिंदे यांनी प्रतिपादन केले की, म्हाडाच्या कार्याची जनतेस माहिती व्हावी व त्यायोगे प्रसिध्दी मिळावी म्हणून म्हाडाच्या नावाचा एक फलक ( बोर्ड ) तयार करुन औरंगाबाद विमान तळालगत मंडळाच्या मुकुंदवाडी / मुर्तीजापूर योजनेच्या कोपऱ्यातील मोक्याच्या जागेवर लावण्यांत यावा. मा. सभापती यांनी सूचना दिली की, उपरोक्त प्रमाणे म्हाडाच्या नावाचा फलक ( बोर्ड ) लावण्यांत याचा मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, वरील बाबतीत उचित कार्यवाही करण्यात येईल.

८) औरंगाबाद जिल्हयात मौजे दौलताबाद, वेरुळ व अजिंठा ( फर्दापूर ) येथे पर्यटन विभागाच्या / पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण योजना प्रस्तावित करता येवू शकतात व त्यासाठी जमिनी मिळविण्यासाठीची कार्यवाही मंडळाचे अधिकारी यांनी करावी असा प्रस्ताव मा. डॉ. श्री. शिंदे , सदस्य यांनी प्रस्ताव मांडला. या बाबत मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले की, उपरोक्त ठिकाणी मंडळाच्या गृहनिर्माण योजना प्रस्तावित करण्यासाठी मंडळाचे अधिकाऱ्यांनी जमिनीची पाहणी करुन जमिनी मिळविण्यासाठी कार्यवाही करावी. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की उपरोक्त ठिकाणी प्रथम जमिनीची पहाणी करुन योग्य जमिनी मिळविण्यासाठी कार्यवाही करण्यांत येईल.

९) मा. सभापती यांनी बैठकीत सुचना दिल्या की, मराठवाडा विभागात प्रत्येक जिल्हयांत बेघरांसाठी (ग्रामीण भागांत) किमान १५,००० घरांचा योजनेचा प्रस्ताव शासनास / प्राधिकरणास मंजूरीसाठी पाठविण्यांत यावा म्हणजे म्हाडाच्या योजना ग्रामीण भागांत कार्यान्वीत होवू शकतील व बेघरांना घरे मिळू शकतील. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, वरील प्रमाणे प्रस्ताव शासनाकडे / प्राधिकरणांकडे त्या - त्या गावातील मागणीनुसार सादर करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.